नि. फौ. ख. क्र.८०/२०१६ निशाणी ५३

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.८ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – लक्ष्मण प्रल्हाद हिरेकर

वय – ३८ वर्षे, व्यवसाय – नोकरी

पत्ता – रा. अकोला नाका, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दि.१३.०२.२०१६ रोजी मी कारंजा रमजानपुर येथे माझा जावाई प्रकाश सिताराम शेगोकार यांच्या मुलीच्या लग्नामध्ये गेलेलो होतो. मी लग्नामध्ये हजर असताना पानेरीचा कार्यक्रम दुपारी १ ते १.३० वा. सुमारास सुरु होता. त्यावेळी श्रीकृष्ण शेगोकार हे त्या कार्यक्रमाच्या गर्दीमध्ये आले व त्यांनी प्रकाश शेगोकार यास म्हणाले की, तुझ्या मुलीच्या लग्नाची पत्रीका मला का दिली नाही. प्रकाशने त्याच्या बोलण्याकडे टाळाटाळ केली त्यावेळी श्रीकृष्ण याने लोखंडी घणाने प्रकाश यांच्या मानेच्या खाली मारले, त्यामुळे प्रकाश यास चक्कर येवून खाली पडले. त्यानंतर प्रकाश याच्या पत्नीने प्रकाश यास आवरले. तिला देखील आरोपी याने धक्काबुक्की केली व दोघांना जिवे मारण्याची धमकी दिली. श्रीकृष्ण शेगोकार हा तेथून निघून गेला.

२. प्रकाश यांना वैद्यकीय उपचाराकरीता दवाखान्यात नेले. त्यानंतर प्रकाश शेगोकार याने पो.स्टे. येथे जावून सदर घटनेची माहिति पोलीसांना दिली. ज्या घणाने आरोपीने प्रकाश यास मारहाण केली तो पाहिल्यास मी ओळखू शकतो. आता न्यायालयात आर्टीकल अ कडील मुद्देमाल साक्षीदार यास दाखविण्यात आला तो तोच आहे. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांचे मार्फत उलटतपासः**

३. घटनेच्या दिवशी सुरु असलेल्या पानेरीच्या कार्यक्रमात गावातील मंडळी, व वधु व वर यांचे नातेवाईक व मित्र मंडळी हजर होते. हे म्हणणे खरे आहे की, पानेरीचा

कार्यक्रम हा मंडपाच्या बाहेर गेटवर गल्लीमध्ये सुरु होता. हे म्हणणे खरे आहे की, पानेरीच्या कार्यक्रमामध्ये फक्त पुरुष मंडळी उपस्थित होते तेथे स्त्रीया उपस्थित नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ कडील घण मंडपवाले व लोखंडवाले वापरतात. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ कडील लोखंडी घण हा गर्दीमध्ये मारता येवू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३.०२.२०१६ रोजी माझ्या भाचीचे लग्न नव्हते. माझा जावाई प्रकाश व आरोपी यांचे पुर्वीपासून वाद होते म्हणून आरोपी विरुध्द प्रस्तुतचा गुन्हा दाखल केलेला आहे, याबाबत मी सांगू शकत नाही. मी जे पाहीले आहे, ते सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला आज न्यायालयात समजावून सांगितले त्यानुसार मी आज न्यायालयात साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझी विचारपूस केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०६.११.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.06 17:35:43 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०६/११/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०६/११/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०६/११/२०२५ |